# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता आचारसंहिता
### Code of Conduct

१) प्रशासकीय अधिकारी व कर्मचा-यांनी दुसरा व चौथा शनिवार खेरिज कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेचे पालन करणे आवश्यक आहे.

२) ज्या पदांसाठी गणवेश आहे त्या कर्मचा-यांने दररोज स्वच्छ व निटनेटका गणवेश परिधान करावा.

३) दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ९ अन्वये व आस्थापना विभागाच्या जा. क्र. आस्था/ २०११-१२/२०९८, दि. १४ जून, २०११ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यापीठातील वर्ग १,२,३ व ४ च्या अधिकारी व कर्मचा-यांनी सर्वसाधारण नियमावलीनुसार व पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडव्यात.

४) अधिकारी व कर्मचा-यांनी कार्यालयीन शिस्तीचे पालन करावे कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहावे. त्यांना नेमून दिलेली कामे कार्यालयीन वेळेत मन:पुर्वक व प्रामाणिकपणे करावीत.

५) अधिकारी व कर्मचा-यांनी विद्यापीठाशी निवडीत सर्व घटकांशी त्यामध्ये लोकप्रतिनिधी, संस्थाचालक, संस्थाप्रतिनिधी, विविध प्राधिकरणाचे सन्माननीय सदस्य, विविध अधिकारी मंडळावरील सन्माननीय सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी, अभ्यागत, पालक, नार्गारिक, शासनाचे प्रतिनिधी, माध्यमांचे प्रतिनिधी, पत्रकार यांच्याशी सौजन्याने सहकार्याने वागावे.

६) अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्या वरिष्ठ व कनिष्ठ दर्जाच्या सर्व सहका-यांशी स्नेहपूर्ण, सहकार्याचे, नम्रतेचे संबंध ठेवावेत.

७) अधिकारी व कर्मचारी यांनी क्षोभाचा कितीही मोठा प्रसंग उद्भवला तरीही आपल्या मनावरील ताबा सुटू देवू नये आणि मोठया आवाजात/ कठोरपणे बोलू नये.

८) अधिकारी व कर्मचा-यांनी प्रामाणिकपणे व सचोटीने वागावे.

९) अधिकारी व कर्मचा-यांनी उच्च नैतिक मूल्यांची जोपासना करावी.

१०) अधिकारी व कर्मचा-यांनी कार्यालयाने त्याला शक्ती प्रदान केल्याशिवाय शासकीय कर्तव्ये पार पाडीत असताना त्याच्या हाती आलेली माहिती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वृत्तपत्रांना किंवा कार्यालयाच्या बाहेरच्या प्राधिका-यांना किंवा खाजगी संस्थांना किंवा व्यक्तींना उपलब्ध करुन देऊ नये.

११) अधिकारी व कर्मचा-यांनी कार्यालयीन माहितीची गुप्तता राखावी. जी माहिती गोपनीय आहे किंवा गुप्त समजण्यात येते अशा कार्यालयीन माहितीचा गौप्यस्फोट/ गौप्यभेद होऊ न देणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

१२) अधिकारी व कर्मचा-यांनी कोणत्याही राजकीय पक्षांशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवता कामा नयेत किंवा राजकीय स्वरुपाच्या कोणत्याही चळवळीमध्ये त्यांनी भाग घेता कामा नये.

१३) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, वर्तणूक) १९८१ मध्ये नमुद तरतुदींचेअनुपालन करावे.

१४) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ तयार करण्यात आलेले असून त्यांची माहिती शासकीय अधिकारी व कर्मचा-याला असो वा नसो ते त्याला बंधनकारक आहेत.

१५) प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचा-याने नेहमीच नितांत सचोटी राखावी, कर्तव्य परायणता ठेवावी आणि शासकीय अधिकारी व कर्मचा-याला अशोभनीय ठरेल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये.

१६) शासकीय अधिकारी व कर्मचारी -

१) संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मूल्ये यांच्याप्रती वचनबध्द असेल.

२) भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता, राज्याची सुरक्षितता, सार्वत्रिक सुव्यवस्था, सभ्यता आणि नैतिक मूल्ये यांचे रक्षण करील आणि त्यांचे प्रचालन करील.

३) उच्च नैतिक मानके आणि सचोटी बाळगील.

४) राजकीयदृष्टया तटस्थता ठेवील.

५) लोकांप्रती, विशेषत दुर्बल घटकांप्रती प्रतिसादी असेल.

६) कर्तव्य पार पाडीत असताना गुणवत्ता, औचित्य आणि नि: पक्षपातीपणा या तत्वांचे अनुसरण करील.

७) उदारदायित्व आणि पारदर्शकता ठेवील.

८) लोकांप्रती सौजन्य आणि सद्वर्तन ठेवील.

९) केवळ सार्वजनिक हिताचे निर्णय घेईल आणि सार्वजनिक साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने, परिणाम कारकतेने आणि काटकसरीने वापर करील किंवा वापरण्यास लावील.

१०) त्याची कार्यालयीन कर्तव्ये बजाविण्यावर परिणाम होईल अशा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संघटनेच्या कोणत्याही आर्थिक आबंधनामध्ये स्वत:ला गुंतवून घेणार नाही.

११) औचित्यपूर्वक आणि नि:पक्षपातीपणे कार्य करील आणि कोणाशीही विशेषत: समाजातील गरीब आणि वंचित घटकांशी भेदभाव करणार नाही.

१२) त्याची कर्तव्ये पार पाडताना शिस्त राखील आणि त्याला यथोचितरित्या कळविण्यात आलेल्या आदेशांचे पालन करण्यास जबाबदार असेल.

१३) व्यावसायिकतेच्या उत्तम दर्जाने आणि त्याच्या सर्वोत्तम क्षमतांनुसार समर्पित होऊन त्याची कर्तव्ये बजावील आणि पार पाडील.

| | | |
|---|---|---|
| १९-१०-१९ | 19-10-2019 | 19.10.19 |
| (डॉ.शि. ना. शिंदे)<br>सहाय्यक कुलसचिव<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर<br>सोलापूर विद्यापीठ, सोलपूर. | (मा. प्रा. डॉ. वि. बा. पाटील)<br>संचालक<br>पदार्थविज्ञान संकुल<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर<br>सोलापूर विद्यापीठ, सोलपूर. | (मा. प्रा.डॉ. वि. भा. घुटे )<br>मा.कुलसचिव<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर<br>सोलापूर विद्यापीठ, सोलपूर. |